# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** संत तुकारामनगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0127 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/05/2025 08:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 14/05/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/05/2025
**Time From (वेळेपासून):** 16:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/05/2025 **Time (वेळ):** 08:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 011
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/05/2025 08:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पिंपरी चिंचवड महानगरपालीका

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ध्रुव मिलींद राजोरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फलट नं 70,कुमार मेनोर,शांताई हटेल मागे, रास्ता पेठ,संत तुकारामनगर, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फलट नं 70,कुमार मेनोर,शांताई हटेल मागे, रास्ता पेठ,संत तुकारामनगर, पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7972706593

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | स्वप्निल मनोहर पाटील | | | 1. फलट नं 01,सुखवाणी लन्स, बी,अजमेरा सोसायटी, पिंपरी, पुणे,संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,00,000/ रुपये (रूपये 500/ दराच्या 80 चलनी नोटा व 200 रु दराच्या 50 नोटा तसेच 500 रु दराच्या 100 | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

100,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.14/05/2025

मी ध्रुव मिलींद रोजोरे वय- 30 वर्षे, रा. प्लॅट नं 701 कुमार मेनोर, सव्र्हे नं 428/429, रास्ता पेठ, पुणे मो.नं – 7972706593 माझा व माझ्या वडीलांचा श्री ट्रेडींग नावाची कंपनी असुन आमच्या कंपनीमध्ये स्टिल पासुन डाय प्लेट बनविण्याचा व्यवसाय आहे. सदरचा व्यवसाय हा मी मागील 10 वर्षापासुन करीत आहे.

आज रोजी लाप्रवि कार्यालयात समक्ष हजर राहुन जबाब लिहुन देतो की, आमची भोसरी एमआयडीसी येथे श्री ट्रेडींग नावाची कंपनी आहे. मी व माझे वडील श्री. मिलींद जवाहर राजोरे असे आम्ही दोघे मिळुन सदर कंपनीचा कारभार पहातो. सदर कंपनीमध्ये मी व माझे वडील पन्नास पन्नास टक्के भागीदार आहोत. सदरची कंपनी ही मागील सोळा वर्षापासुन असुन आमची कंपनी भोसरी एमआयडीसी, टेल्को रोडवर, सव्र्हे नं 99, प्लॉट नं 8, यशवंत नगर येथे आहे.

दिनांक 25/04/2025 रोजी आमचे कंपनीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालीकेचे दोन इसम आले त्यावेळेस माझे कंपनीमध्ये मी व माझा मॅनेजर शैलश माने हजर होतो. आलेल्या दोन इसमांपैकी एक इसम मला म्हणाला की, तुमच्या कंपनीच्या विरुध्द वायु प्रदुषनाची सारथी अॅपवर ऑनलाईन तक्रार आली असुन आजुबाजुच्या लोकांना कंपनीतुन येणा-या वासाचा त्रास होत आहे. असे म्हणुन त्याने त्याचे मोबाईल मध्ये आलेली तक्रार मला दाखविली, ती तक्रार मी वाचुन पाहीली त्यामध्ये तक्रारदार म्हणुन मोहन सुर्यवंशी असे नाव मला दिसले. त्यानंतर आमच्या कंपनीचे सुपरवाईझर शैलेश माने यांनी त्या दोन्ही अधिका-यांना आमची संपुर्ण कंपनी दाखविली. त्यानंतर मी त्यांचे नाव विचारले असता त्यातील एकाने मला त्याचे नाव स्वप्नील पाटील असे सांगीतले व दुस-याचे नाव करपे आहे असे सांगुन ते पिंपरी मनपा मध्ये इंजिनीअर असल्याचे संागीतले. त्यांनतर स्वप्नील पाटील याने ऑनलाईन तक्रार करणारे सुर्यवंशी नावाच्या व्यक्तीला आमचे समोर फोन करुन कंपनीमध्ये बोलावुन घेतले व आमचे कंपनीमध्ये बसुन स्थळपहाणी पंचनामा केला त्या पंचनाम्यावर माझी, कंपनीचे सुपरवाईझर शैलेश माने तसेच तक्रारदार सुर्यवंशी यांच्या सहया घेतल्या. त्यानंतर स्वप्नील पाटील यांनी मला तुमच्याकडे महाराष्ट्र पोलुशन कंट्रोल बोर्डचे सर्टीफीकेट आहे का असे विचारले परंतु ते सर्टीफीकेट आमचेकडे नाही असे मी त्यांना सांगीतले. त्यानंतर स्वप्नील पाटील, इंजिनिअर यांनी माझा, माझे वडील व आमचे सुपरवाईझर शैलेश माने यांचा मोबाईल नंबर घेवुन ते त्याठिकाणाहुन निघुन गेले. दोन तिन दिवसांनंतर स्वप्नील पाटील यांनी त्याचा मो.नं 9922334756 वरुन मला माझे मोबाईल क्रं 7972706593, तसेच माझे वडील मिलींद राजोरे यांचा मो नं 9371001891 तसेच आमच्या कंपनीचे मॅनेजर शैलेश माने यांचा मोनं 7249288680 यांना वारंवार फोन करुन महाराष्ट्र पोलुशन कंट्रोल बोर्डचे सर्टीफिकेट नसल्यामुळे तुमच्यावर कारवाई करणार आहे. व त्याबाबत तुम्हाला नोटीस तयार केलेली आहे तुम्ही नोटीस घ्यायला या आणि जर तुम्हाला कारवाई करायची नसेल तर तुम्ही मला भेटा असे बोलु लागले. लोकसेवक स्वप्नील पाटील हे मला कश्यासाठी भेटण्यासाठी बोलवत आहे याची मला शंका आली होती. परंतु मी त्यांना भेटण्यासाठी गेलो नाही परंतु ते मला वारंवार फोन करुन भेटण्यासाठी बोलावुन त्रास देवु लागले. म्हणुन मी दिनांक 06/05/2025 रोजी आमचे कंपनीचे मॅनेजर शैलेश माने यांना पीसीएमसी पिंपरी कार्यालयात स्वप्नील पाटील



Scanned with CamScanner

यांना भेटण्यास पाठविले. त्यावेळेस पुन्हा स्वप्नील पाटील याने आमचे मॅनेजर यांना कारवाई करायची नसेल तर एक लाख रुपये दयावे लागतील असा निरोप तुमच्या मालकांना दे असे सांगीतले. त्यानंतर आमचे मॅनेजर शैलेश माने याने मला ही गोष्ट येवुन सांगीतली होती. परंतु मी त्याकडे दुर्लक्ष केले.

आज दिनांक 14/05/2025 रोजी स्वप्नील पाटील, कनिष्ठ अभियंता, पीसीएमसी याने पुन्हा त्याचा मोनं 9922334756 वरुन माझे वडील श्री.मिलींद राजोरे यांचा मोनं 9371001891 यांना दुपारी 12.05 च्या सुमारास फोन करुन तुम्ही आज नोटीस घेवुन जा नाहीतर पैसे घेवुन या म्हणुन फोन केला. सदरची ही बाब माझे वडील यांनी मला सांगीतली. स्वप्नील पाटील, इंजिनिअर, पीसीएमसी, मनपा हे कारवाई न करण्यासाठी आमचकडे एक लाख रुपयाची लाचेची मागणी करत आहे व ती देण्याची आमची इच्छा नसल्याने त्याचेविरुध्द तक्रार देण्याचा निर्णय घेतला. माझे वडीलांचा मोनं 9371001891 यावरुन आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ऑफीसला फोन केला व मला तक्रार करायची आहे असे सांगीतले यावर समोरील इसमाने आम्हाला 9423884745 हा नंबर देवुन तेथिल अधिकारी गावडे साहेब यांना फोन करुन तक्रार देण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही वरील मोबाईल नंबरवर गावडे साहेबांना संपर्क केला व पीसीएमसी कडील अधिकारी स्वप्नील पाटील हे आमचे कंपनीचे विरुध्द वायु प्रदुषणची करवाई न करण्यासाठी आम्हाला एक लाख रुपयांची लाच मागत असल्याचे सांगीतले. त्यावेळेस तेथिल अधिकारी गावडे साहेब यांनी कारवाई करण्यासाठी तात्काळ टिम तुमच्याकडे पाठवितो असे सांगीतले.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मला तेथील अधिकारी पोनि लोणारे यांचा फोन आला व आम्ही तुमच्याकडे येत आहे असे त्यांनी मला सांगीतले. पोनि लोणारे व त्यांचे सापळा पथक हे दुपारी 3.30 वाजेच्या सुमारास आमचे श्री ट्रेडींग कंपनीमध्ये आले. त्यावेळेस कंपनीमध्ये मी व माझे वडील श्री. मिलींद राजोरे हे हजर होतो. पोनि लोणारे यांनी सापळा पथक, पंचांची व माझी ओळख करुन दिली. मी माझी तक्रार तोंडी पोनि लोणारे यांना सांगीतली व त्यानंतर ती तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरामध्ये मी लिहुन दिली व ती पंचांना दाखविली सदर तक्रार दोन्ही पंचांनी वाचली व त्यावर सहया केल्या. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला पडताळणी व सापळा कारवाई बाबत माहीती दिली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला व्हाईस रेकॉर्ड दाखविले व त्याबाबत माहीती दिली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पंच क्रं 1 म्हणुन श्री राहुल सोनवणे व पंच क्रं 2 म्हणुन श्री संदीप वालकोळी हे काम पाहतील असे पोनि लोणारे यांनी ठरविले. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पोनि लोणारे यांनी माझे व पंच क्रं 1 राहुल सोनवणे यांचे निवेदन 16.47 वा. व्हॉईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करुन लोकसेवक स्वप्नील पाटील, कनिष्ठ अभियंता, पीसीएमसी, पिंपरी चिंचवड हे लाचेची मागणी करतात किंवा कसे यासाठी लाचेच्या मागणीची पडताळणी कारवाई आमचे श्री ट्रेडींग कंपनीमध्ुनच करणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी 17.03 वा व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे शर्टच्या आतमध्ये सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन दिला व मला माझेकडील निळया रंगाची टाटा टिअॅगो चारचाकी क्रं एमएच 14 केडब्लु 6498 मधुन लोकसेवक स्वप्नील पाटील, कनिष्ठ अभियंता, पीसीएमसी,पुणे यांची भेट घेणेकामी पंच क्र.1 यांचेसह रवाना केले. त्यावेळेस मी स्वता: गाडी चालवित होतो व पंच श्री. सोनवणे हे माझे बाजुचे सिटवर बसलेले होते. मी ,पंच क्र 1 यांचेसोबत माझे चारचाकी वाहनामधुन पीसीएमसी, पिंपरी कार्यालयाच्या गेट जवळ गेलो व मी स्वप्नील पाटील यांना फोन केला व तो फोन रेकॉर्ड करण्यासाठी माझा मोबाईल फोन मी स्पिकरवर टाकला व आम्ही आलो असल्याचे सांगीतले यावर लोकसेवक स्वप्नील पाटील यांनी कार्यालयाच्या बाहेरील गेटवर आम्हास थांबण्यास सांगीतले. थोडावेळात लोकसेवक पाटील हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले व माझ्या चारचाकी वाहनामध्ये मागच्या सिटवर बसले. तेव्हा पंचासमक्ष आमचेमध्ये माझे कामासंदर्भात चर्चा झाली. तेव्हा स्वप्नील पाटील यांनी मला जवळच असलेल्या टपरीवर आपण चहा घेवुन असे म्हणुन गाडी रोडच्या कडेला असलेल्या टपरीकडे घेण्यास सांगीतली. त्यानंतर गाडी बंद करुन मी पंच व लोकसेवक असे तिघे खाली उतरुन चहा घेत असतांना लोकसेवक पाटील यांनी सुरवातीला कामा संदर्भात चर्चा केली व मला "व्यवस्थित आकडा देवुन करुन घ्या" असे म्हणाले यावर मी त्यांना "आकडा म्हणजे क्लिअर तुम्ही सांगणार तर, आम्ही बिझनेस वाले लोक आहेत, सर" असे म्हणालो यावर लोकसेवक पाटील हे मला म्हणाले की, "अशा गोष्टींमध्ये ना , 1-1 लाख रुपये लोकांनी दिले, तर या गोष्टी करा, अन करुन घ्या विषय" असे बोलले. यावर मी लोकसेवक पाटील यांना काहीतरी कमी करण्याबाबत विनंती केली असता लोकसेवक पाटील हे मला बोलले की, "मी तर 1 लाख रुपये बोललो" यावर मी त्यांना म्हणालो की, "आमचा काय इतका मोठा व्यवसाय नाहीये, समजुन घ्या सर" यावर लोकसेवक पाटील मला बोलले की, "तुझ्या वडीलांशी बोल, तुमचा आकडा बोला, आणि विषय संपवुन टाक" असे बोलले यावर मी लोकसेवक पाटील यांना "मी अध्र्या तासात कॉल करुन सांगतो" असे बोलले. लोकसेवक पाटील यांनी मला वडीलांशी चर्चा करुन आकडा फाईनल करुन व्हॉटसअॅप कॉल करण्यास सांगीतले व पुन्हा ते त्यांचे कार्यालयात निघुन गेले. त्यानंतर मी व पंच सोनवणे असे सापळा पथक थांबलेल्या श्री ट्रेडींग कंपनीमध्ये 17.41 वा परत आलो



Scanned with CamScanner

त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी आम्हास घडलेली हकीगत विचारली असता, मी व पंचानी वरील प्रमाणे हकीगत पंच क्रं 2 यांचेसमक्ष सांगितली व पोनि लोणारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यामधील माझे व लोकसेवक पाटील यांचेतील ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता, लोकसेवक स्वप्नील पाटील यांनी माझेकडे पुढील कारवाई न करण्यासाठी 1,00,000/- रुपयांची मागणी करुन ती रक्कम लगेच स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे पो.नि. लोणारे व सपळा पथकाने पुढील सापळा कारवाई लगेच करण्याचे ठरविले. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक स्वप्नील पाटील यांनी मागणी केल्याप्रमाणे 1,00,000/- रुपये लाच रक्कम मला हजर करण्याबाबत सांगितले असता मी माझेकडील व्यवसायाकरीता ठेवलेले असलेले 50,000/- रुपये हजर केले व रक्कम पुर्ण नसल्याने पो.नि. लोणारे यांनी उर्वरीत 50,000/- रुपयाची रक्कम ही खेळण्यातील बनावट नोटा वापरण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पो.नि. लोणारे यांचे सुचने प्रमाणे मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 80 व 200 रुपये दराच्या 50 नोटांचे नंबर पोशि दिवेकर यांनी पंच क्रं 02 यांचे मदतीने एका को-या कागदावर आमचे समक्ष नमूद करुन करुन घेतल्या. पो.नि. लोणारे यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या खेळण्यामधील 500/- रुपये दराच्या 100 बनावट नोटा व मी हजर केलेल्या लाच रकमेमध्ये एकत्र केल्या. त्यानंतर पो.नि. लोणारे यांचे सुचनेवरुन पोशि/ठाकुर यांनी कार्यालयात दोन्ही पंच साक्षीदार व मला अल्ट्राव्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सं ागुन लाच रकमेला अल्ट्राव्हॅ ायोलेट पावडर लावली. त्यावेळी मी लोकसेवक पाटील यांना असे पैसे दिले तर संशय येईल म्हणुन सदरची रक्कम एका पांढ-या कागदामध्ये गुंडाळुन देणेबाबत विनंती केली.

त्यानंतर पोशि/ठाकुर यांनी मी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 80 भारतीय चलनी नोटा,200 रुपये दराच्या 50 नोटा व 500 रुपये दराच्या 100 बनावट नोटा व एक कोरा ए 4 साईझचा कागदारव अ ॅन्थ्रासीन पावडर लावण्याची कार्यवाही केली. व त्या नोटांचा बंडल कागदामध्ये गुंडाळुन माझ्या पँटच्या समोरील उजव्या खिशांत ठेवल्या. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी मला व सापळा पथकास सापळा कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच पोशि दिवेकर यांनी शासकीय व्हिडीओ कॅमेरा सोबत घेऊन लाच रक्कम जप्त करतेवेळी त्याचे चित्रीकरण करावे असे ठरले. व लाच रक्कम गाडीमध्ये दिल्यानंतर गाडीचे चारही इंडीकेटर लावुन इशारा करण्यास सांगीतला . तसेच गाडीच्या बाहेर लाच रक्कम दिल्यास शर्टच्या खिशातील ठेवलेला कागद बाहेर काढुन इशारा करण्यास सांगीतले.

त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक पाटील यांनी सांगीतल्या प्रमाणे मला 18.30 वा लोकसेवक पाटील यांना व्हॅाट्सअ ॅप कॉल करण्यास सांगीतला असता, लोकसेवक पाटील यांनी मला अध्र्या तासात ये म्हणुन सांगीतले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी 18.45 वा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे शर्टचे आत सेफटी पिनच्या साहयाने लावुन मला पंच नं. 1 श्री. राहुल सोनवणे यांचेसोबत माझे चारचाकी गाडीतुन रवाना केले. त्यावेळेस सुध्दा मीच गाडी चालवित होतो व पंच श्री. राहुल सोनवणे हे पुढच्या सिटवर बसले होते.आम्ही निघाल्यावर आमचे मागोमाग संपुर्ण सापळा पथक पीसीएमसी कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावून थांबले. तेव्हा आम्ही आमचेकडील चारचाकी वाहन कार्यालयाच्या बाहेर थांबुन लोकसेवक यांना व्हॅाटसअ ॅप कॉल केला व तो कॉल रेकॉर्ड करण्यासाठी स्पिकरवर टाकला तेव्हा लोकसेवक पाटील यांनी मला तेथेच थांबण्यास सांगीतले व फोन कट केला सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेला आहे. थोडयाचवेळात लोकसेवक हे कार्यालयाच्या बाहेर चालत आले त्यावेळी त्यांचे पाठीवर एक निळया रंगाची सॅक होती. लोकसेवक गाडीजवळ आल्यावर इशा-याने पंच यांना खाली उतरण्यास सांगीतले, त्याप्रमाणे पंच गाडीचे खाली उतरताच लोकसेवक पाटील यांनी त्यांचे पाठीवरील सॅक काढुन ते माझ्या बाजुचे सिटवर येवुन बसले. व बाजुलाच असलेल्या चहाच्या टपरीवर गाडी घेण्यास सांगीतली. मी माझी गाडी हळुवार रस्त्याच्या बाजुला असणा-या चहाच्या टपरीजवळ घेतली. पंच माझ्या गाडीच्या मागे चालत आले. त्यानंतर मी गाडी बंद केली. पंच माझ्या गाडीच्या बाहेर येवुन थांबले. मी लोकसेवक स्वप्नील पाटील यांना म्हणालो की, “एक लाख जास्त होताय मी वडीलांनी म्हणल की, प्रॉब्लेम मधुन आपण निघु बाहेर पडु तर ते म्हणले ठिक ये” यावर लोकसेवक स्वप्नील पाटील म्हणाले की “प्रॉब्लेम बंद म्हणजे काय त्या गोष्टी पण , आता एवढं दिवस तुम्हाला कोणी विचारलाय का” असे म्हणाले. त्यानंतर मी माझे पॅन्टच्या उजव्या खिशातील रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन लोकसेवक पाटील यांचे समोर धरली व “1 लाख पुर्ण आहेत मोजुन घ्या” असे सांगीतले. यावर लोकसेवक पाटील यांनी “चालेल एवढ् ं मोजत बसायचा विषय नाय” असे म्हणुन त्यांचेकडे असलेल्या निळया रंगाच्या सॅगची चैन उघडुन मी दिलेली लाच रक्कम त्यांनी उजव्या हातात घेवुन ती लाच रक्कम सॅग मध्ये ठेवली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझ्या गाडीचे चारही इंडीकेटर चालु करुन सापळा पथकास लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. तेवढयात लोकसेवक हे त्यांची सॅक घेवुन गाडीचे खाली उतरले तेव्हा सापळा पथकातील पोनि लोणारे यांनी तात्काळ येवुन लोकसेवक पाटील यांचा उजव्या हाताच्या मनगटाच्या वरील बाजुस हात पकडला व पोनि ठाकुर यांनी डाव्या हाताच्या मनगटाच्या वरील बाजुस हात पकडुन



Scanned with CamScanner

लोकसेवक स्वप्नील पाटील, कनिष्ठ अभियंता, पीसीएमसी, पिंपरीे यांना 19.12 वा ताब्यात घेतले. पोनि लोणारे मला लाच रक्कम कोठे ठेवली असे विचारल्यावर मी त्यांना सदरची लाच रक्कम ही लोकसेवक स्वप्नील पाटील याने स्विकारुन त्यांनी त्याचेकडे असलेल्या निळया रंगाच्या सॅगमध्ये ठेवल्याचे सांगीतले. यावर पो.नि. लोणारे यांनी तात्काळ ती निळया रंगाची सॅक लोकसेवक स्वप्नील पाटील याचे कडुन ताब्यात घेतली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच क्र 2 श्री. वालकोळी यांनी लोकसेवक स्वप्नील पाटील यांनी स्विकारलेली लाच रक्कम त्यांनी त्यांचे निळया रंगाच्या सॅगमधुन काढुन ताब्यात घेऊन ती मोजली असता त्यामध्ये भारतीय चलनी नोटा 500/- रुपये दराच्या 80 व 200 रुपये दराच्या 50 नोटांचे नंबर व 500 रुपये दराच्या 100 बनावट नोटा एका को-या कागदामध्ये गुंडाळलेल्या असे एकूण 1,00,000/- रुपये असल्याचे दिसून आले. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी सदर लाच रकमेचे नोटांचे नंबर्स सापळापुर्व कारवाई दरम्यान को-या कागदावर लिहीलेल्या नोटांचे नंबरशी पडताळणी केली असता त्या तंतोतंत जुळून आल्या.

त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक स्वप्नील पाटील यांना त्यांचे पुर्ण नाव-पत्ता विचारले असता त्यांचे नाव स्वप्नील मनोहर पाटील वय- 40 वर्षे पद -कनिष्ठ अभियंता, पर्यावरण अभियांत्रीकी विभाग, पीसीएमसी, पिंपरी रा. बी सुखवाणी लॉन्स, प्लॅट नं 1 अजमेरा सोसायटी, मोरवाडी, पिंपरी, पुणेे असे सांगीतले. तेव्हा पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक पाटील यांना शासकीय गाडीत बसवुन काळया पडदयाचा अंधार करुन लोकसेवक स्वप्नील पाटील यांनी स्विकारलेल्या लाच रक्कमेची अल्ट्राव्हायलेट दिव्यामध्ये तपासणी केली असता लोकसेवक यांचे उजवे हाताच्या पे-यावर तसेच त्यांचे निळया रंगाच्या सॅकचे आतील बाजुस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर पो.नि. लोणारे यांनी लोकसेवक स्वप्नील पाटील यांचेकडील माझे कामासंदर्भातील सर्व कागदपत्रे ताब्यात घेतली व नमूद लोकसेवक यांना ताब्यात घेवून आम्ही संपुर्ण सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात पुढील कार्यवाही कामी परत आलो.

तरी दि. 14/05/2025 रोजी दुपारी 14.50 ते सायंकाळी 19.30 वा झालेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालीका,कार्यालयाचे रोडवर लोकसेवक स्वप्नील मनोहर पाटील वय - 40 वर्षे पद - कनिष्ठ अभियंता, पर्यावरण अभियांत्रीकी विभाग, पीसीएमसी, पिंपरी रा. बी सुखवाणी लॉन्स, प्लॅट नं 1 अजमेरा सोसायटी, मोरवाडी, पिंपरी, पुणेे यांनी माझे कंपनीच्या विरुध्द असलेल्या वायु प्रदुषणाच्या तक्रारीवर कारवाई न करण्याकरीता एक लाख रुपयाची लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन सदरची लाच ही पिंपरी चिंचवड महानगरपालीकेच्या सार्वजनिक रोडवर पंचासमक्ष स्विकारली असता, त्यांना पोनि लोणारे साहेब अॅन्टीकरप्शन ब्युरो पुणे यांनी रंगेहात पकडले म्हणून माझी स्वप्नील मनोहर पाटील वय - 40 वर्षे पद - कनिष्ठ अभियंता, पर्यावरण अभियांत्रीकी विभाग, पीसीएमसी, पिंपरी रा. बी सुखवाणी लॉन्स, प्लॅट नं 1 अजमेरा सोसायटी, मोरवाडी, पिंपरी, पुणेे यंाचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे. सदर बाबत पोनि लोणारे साहेब यांनी घडलेल्या सर्व घटणेचा सविस्तर पंचनामा केला आहे.

माझा वरील जबाब मी वाचुन पाहीला असून, तो माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vanita Shrikant Dhumal(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

DMRajore

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vanita Shrikant Dhu

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner